# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

## अभिवेदन (Representation) क्रमांक ५१ / २०२२

नवीन वीज जोडणी वेळेत न मिळाल्याने नुकसान भरपाई मिळण्याबाबत

डॉ. श्री. विश्वनाथ परशुराम सकपाळ.......................................................................................... अपिलार्थी

विरूध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, चिपळूण (महावितरण) .................................................. ........ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- आनंद शिवराम ओक, ग्राहक प्रतिनिधी

प्रतिवादीतर्फे :- कैलाश पी. लवेकर, कार्यकारी अभियंता, चिपळूण

कोरम :- वन्दना कृष्णा (निवृत्त भा.प्र.से.)

सुनावणी तारीख :- २० मे २०२२

आदेश पारित दिनांक :- २ जून २०२२

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, कोल्हापूर परिमंडळ, (मंच) यांच्या दिनांक १३ आक्टोबर २०२१ च्या आदेशाविरूध्द व दिनांक ३१ जानेवारी २०२२ च्या पुनर्विलोकन आदेशाविरूध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक ८ एप्रिल २०२२ रोजी दाखल केलेले आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

२.   मंचाने तक्रारदार यांचा अर्ज क्रमांक ११/२०२१ बाबत दिनांक १३ ऑक्टोबर २०२१ रोजी खालील प्रमाणे आदेश पारित केला.

"१)   वादीचे गाऱ्हाणे अंशतः मंजूर करणेत येत आहे.

२)   वादी तक्रारदार यांची शेती वीज जोडणी मिळणेबाबतची मागणी मंजूर करण्यात येत आहे. वादी तक्रारदार यांच्या मागणी प्रमाणे शेती पंप वीज जोडणी वितरण परवाना धारकाने (वि.प.) अर्जदारास त्यांच्या अर्जानुसार त्या आदेशाच्या तारखेपासून लवकरात लवकर परंतू कोणत्याही परिस्थिती आदेश पारित झालेपासून ३ महिन्याच्या आत शेती पंपासाठी विद्युत पुरवठा देण्यात यावा.

३)   प्रतिवादी वीज वितरण कंपनीने वादी ग्राहकाला शेती पंप वीज जोडणी देणेस झालेल्या विलंबाबाबत नुकसान भरपाई म्हणून वादीने सर्व्हीस कनेक्शनसाठी भरलेल्या रक्कमेच्या दुप्पट इतकी रक्कम देणेत आदेश देण्यात येत आहे.

४)   प्रतिवादी वितरण कंपनीने वादी ग्राहकाला कोटेशन देणेस झालेल्या विलंबाबाबत नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु.२३८००/- व जागेची पाहणी करणे झालेल्या विलंबाबाबत नुकसान भरपाई म्हणून रु.१७५००/- देणेचे आदेश देण्यात येत आहे.

५)   वादी ग्राहकांची त्याचे झाडांच्या लागवडीचे नुकसान झालेबाबत नुकसान भरपाई मिळणेची मागणी नामंजूर करण्यात येत आहे"

मंचाचे सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता यांनी सदर आदेशाशी सहमती न दर्शविता त्यांनी खालीलप्रमाणे आदेश दिले.

"१)   वादीचे गाऱ्हाणे अंशतः मंजूर करणेत येत आहे.

२)   वादी तक्रारदार यांची शेती वीज जोडणी मिळणेबाबतची मागणी मंजूर करण्यात येत आहे. वादी तक्रारदार यांच्या मागणी प्रमाणे शेती पंप वीज जोडणी वितरण परवाना धारकाने (वि.प.) अर्जदारास त्यांच्या अर्जानुसार त्या आदेशाच्या तारखेपासून लवकरात लवकर परंतू कोणत्याही परिस्थिती आदेश पारित झालेपासून ३ महिन्याच्या आत शेती पंपासाठी विद्युत पुरवठा देण्यात यावा.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

३) प्रतिवादी वीज वितरण कंपनीने वादी ग्राहकाला शेती पंप वीज जोडणी देणेस झालेल्या विलंबाबाबत नुकसान भरपाई म्हणून वादीने सर्व्हीस कनेक्शनसाठी भरलेल्या रक्कमेच्या दुप्पट इतकी रक्कम देणेत आदेश देण्यात येत आहे.

४) प्रतिवादी वितरण कंपनीने वादी ग्राहकाला कोटेशन देणेस झालेल्या विलंबाबाबत नुकसान भरपाई व जागेची पाहणी करणे झालेल्या विलंबाबाबत नुकसान भरपाई नामंजूर करणेत येत आहे.

५) वादी ग्राहकांची त्याचे झाडांच्या लागवडीचे नुकसान झालेबाबत नुकसान भरपाई मिळणेची मागणी नामंजूर करण्यात येत आहे"

मंचाच्या आदेशाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दिनांक ६ डिसेंबर २०२२ रोजी पुनर्विलोकन अर्ज दाखल केला. सदर पुनर्विलोकन अर्ज दिनांक ३१ जानेवारी २०२२ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केला.

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनात सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थीने कृषीपंपाकरीता नवीन वीज जोडणीचा विहित नमुन्यातील अर्ज योग्य त्या कागदपत्रासह दिनांक ३१ जानेवारी २०१३ रोजी प्रतिवादी महावितरण (गुहागर उपविभाग) यांच्या कार्यालयात सादर केला. त्यानंतर पुढे वीज जोडणीबाबत प्रतिवादी यांनी काहीही कार्यवाही केली नाही, म्हणून महावितरणकडे चौकशी केली असता, पुढील ३-४ महिन्यात नियमानुसार लाईनचे काम पूर्ण करून आपणास वीज जोडणी देण्यात येईल असे आश्वासन दिले. सबब, दिनांक १० मार्च २०१३ रोजी महावितरण (गुहागर उपविभाग) यांना पत्राद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम २०१४ (कृती मानके, विनियम २०१४) नुसार नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

- दिनांक २० सप्टेंबर २०१७ रोजी सदरचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले व त्यानुसार प्रतिवादीच्या मागणी पत्राप्रमाणे रु.५१७२/- चा भरणा दिनांक २७ सप्टेंबर २०१७ रोजी केला.

- अपिलार्थीने दिनांक १९ ऑक्टोबर २०१९ रोजीच्या पत्रान्वये ८१ महिन्याचा कालावधी होऊन सुध्दा वीज जोडणी दिलेली नसल्याने कृती मानके, विनियम २०१४ नुसार नुकसान भरपाई

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

मिळण्याची व वीज जोडणी तात्काळ देण्याबाबतची मागणी केली. सदर पत्रावर महावितरणने त्यांच्या दिनांक ३० नोव्हेंबर २०१९ रोजीच्या पत्रांन्वये कळविले की, अपिलार्थीचा वीज जोडणीचा अर्ज मंजूर करण्यात आला असून अपिलार्थीस वीज जोडणी देण्याकरीता उच्च दाब वाहिनी १.५ कि.मी. लघुदाब वाहिनी ०.०५ किमी व २५ केव्हीए क्षमतेचे रोहीत्र उभारणी करणे आवश्यक आहे असे कळविले. त्याच पत्रात असेही कळविले की, HVDS (एचव्हीडीएस) योजनेनुसार ज्या ग्राहकांना वीज जोडणीकरीता ०.६ कि.मी ची उच्चदाब वाहिनी किंवा २.५ लाखापेक्षा जास्त खर्च येणार आहे, अशा ग्राहकांना सोलर योजने अंतर्गत वीज जोडणी देण्याचे निर्देश वरिष्ठांकडुन मिळाले होते व त्याप्रमाणे अर्ज करण्याकरीता दिनांक ५ मार्च २०१९ रोजी पत्र क्र.५६२ अन्वये कळविण्यात आले होते. तसेच मुख्य अभियंता, रत्नागिरी यांच्या निर्देशानुसार सदर प्रकारात मोडणाऱ्या ग्राहकांना, एचव्हीडीएस योजने अंतर्गत जेष्ठता यादी नुसार वीज जोडणी देण्याचे काम चालू आहे, असे अपिलार्थीस कळविले. परंतू अपिलार्थीस सौर कृषीपंप योजने अंतर्गत वीज जोडणी घेण्यात स्वारस्य नव्हते. त्यामुळे सदरचा अर्ज सादर केला नाही.

- अपिलार्थीने अभिवेदनात नमुद केले आहे की, सदर परिपत्रकानुसार या योजने अंतर्गत वीज जोडणी घेणे बंधनकारक नाही. तसेच त्या परिपत्रकात लाभार्थी हा शब्दप्रयोग केलेला आहे व याअंतर्गत त्यांना कोणताही लाभ घ्यावयाचा नाही. पारंपारिक पध्दतीने वीज जोडणी करण्यात यावी अशी अपिलार्थीची मागणी आहे. अपिलार्थी यांची ५ अश्वशक्तीचीच मागणी असल्याने सौर कृषीपंप योजना अपिलार्थीसाठी योग्य नाही.

- नवीन कृषीपंप जोडणीबाबत योग्य ती कार्यवाही झाली नाही म्हणून अपिलार्थीने दिनांक ३० जानेवारी २०२० रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) तक्रार दाखल केली. कक्षाने *"सदर तक्रारदारास महावितरणच्या नियमाप्रमाणे लवकरात लवकर कृषी वीज जोडणी देण्यात यावी"* असे आदेश दिले. कक्षाच्या आदेशानंतरही वीज जोडणी वेळेत झाली नाही, म्हणून मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचानेही दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजीच्या आदेशाने अपिलार्थीस *"या आदेशाच्या नव्वद दिवसांत उचीत वेळेत वीज जोडणी देण्याचे तसेच आयोगाच्या आदेशानुसार अपिलार्थीने भरलेल्या सेवा कनेक्शन शुल्काच्या दुप्पट भरपाई देण्याचे निर्देश"* प्रतिवादीस दिले.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- नागरिक म्हणून अपिलार्थी यांना वीज जोडणी मिळण्याचा हक्क आहे, त्यासाठी अपिलार्थीस भरपूर परिश्रम करावे लागले. बराच पत्रव्यवहार करावा लागला, तरीही वेळेत वीज जोडणी मिळाली नाही म्हणून कक्षाकडे, मंचाकडे दाद मागावी लागली. मंचाच्या आदेशाने अपिलार्थीस वीज जोडणी मिळाली, परंतू त्यासाठी झालेल्या खर्चाचा विचार कला गेला नाही. म्हणून अपिलार्थी यांना माननीय विद्युत लोकपाल यांच्याकडे दिनांक १२ मार्च २०२१ रोजी दाखल केले. विद्युत लोकपालांनी दिनांक १० मे २०२१ रोजीच्या आदेशाने खालीलप्रमाणे निर्देश दिले.

  *"हे प्रकरण ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर यांच्याकडे नव्याने सुनावणी (De Novo) करण्याकरीता पाठविण्यात येत आहे. मंचाने या प्रकरणाची सुनावणी घेऊन लवकरात लवकर योग्य ते आदेश पारित करावेत.*

  *या आदेशात लोकपाल यांनी केलेल्या मत प्रदर्शनाचा मंचाच्या निर्णय प्रक्रियेवर कोणताही परिणाम होणार नाही, हे येथे स्पष्ट करण्यात येत आहे."*

- सदर आदेशाच्या निर्देशानुसार अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर मंचाने दिनांक २२ सप्टेंबर २०२१ रोजी सुनावणी घेऊन दिनाक १३ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या आदेशान्वये कृती मानके विनियम २००५ नुसार अपिलार्थीची नुकसान भरपाईची मागणी फेटाळली. सदर आदेशाविरुध्द अपिलार्थीने दिनांक ६ डिसेंबर २०२१ रोजी पुनर्विलोकनाची विनंती केली असता, मंचाने दिनांक ३१ जानेवारी २०२२ च्या आदेशान्वये अपिलार्थीचा पुनर्विलोकनाचा अर्ज नामंजूर केला.

- अपिलार्थीचा अर्ज हा दिनांक ३१ जानेवारी २०१३ आहे हे मंचाने मान्य केले व त्यानुसार अपिलार्थी हे कृती मानके २००५ नुसार नुकसान भरपाईस पात्र आहेत, त्यानुसार त्यांना नुकसान भरपाई मिळालेली आहे. मंचाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर २०२१ च्या आदेशात वीज जोडणी विलंबाबाबतची नुकसान भरपाईची मागणी फेटाळली, पण स्थळ तपासणी विलंब व कोटेशन देण्यास विलंबाबाबतची भरपाईची मागणी मान्य करणे हा विरोधाभास आहे. अपिलार्थीने दिनांक १८ सप्टेंबर २०20 रोजी मंचाकडे तक्रार दाखल केल्याचे नमुद करताना आयोगाच्या केस क्र १०२ / २०१९, दिनांक २० मे २०१९ च्या आदेशानंतर असल्याने सदर अर्ज कृती मानके विनियम २००५ नुसार भरपाईस पात्र नाही, असे समजून रु.९२/- नुकसान भरपाई मान्य केली. केस क्र. ६ / २०१९ चा आदेश हा महावितरणने कृती मानके २०१४ मधील तथाकथीत अडचणी दर करुन घेण्यासाठी असून प्रतिवादींना फायदेशीर असलेले फेरबदल करुन घेतलेले आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

- अपिलार्थीचा अर्ज हा दिनांक ३१ जानेवारी २०१३ असल्याने त्याची पर्तता कृती मानके विनियम २००५ दिनांक ३१ एप्रिल २०१३ पूर्तता होणे आवश्यक होते, सदर बाब दुर्लक्षीत केली जाऊन सन २०१७ नंतर झालेल्या फेरबदलाचे प्रतिवादीचे बेकायदेशीर म्हणने मान्य केले. जानेवारी २०१३ ते डिसेंबर २020 या कालावधीत जोडणी देण्याच्या दृष्टीने काहीही काम केले नसल्याची गंभीर बाब मचाने दुर्लक्षीत केली, पण हरकतीच्या बाबीचा बागुलबुवा मंचाच्या निर्णयात केला. हरकत निवारण करण्याची कायदेशीर जबाबदारी ही प्रतिवादीची असताना ती हरकत जाणीवपर्वक दडपून ठेऊन विलंबाचे खापर अपिलार्थीवर फोडले. सदर बाब मंचाच्या निर्णयात कुठेही नाही.

- महाराष्ट्र इलेक्ट्रीसीटी वर्क्स ऑफ लायन्ससी, रुल्स २०१२ मधील कलम ३ नियम अपिलार्थीस कसा लागू होत नाही, याच अपिलार्थीने खंडन केलेले असतानाही त्यावर मंचाने निर्णायक भुमिका घेऊन, त्याची मंचाच्या निर्णयात नोंद केली आहे. अपिलार्थीचा अर्ज सन २०१३ असताना तो २०१७ असल्याचा खोडसाळपणा प्रतिवादीने केला याबाबत प्रतिवादींवर कोणतीही कारवाई केलेली नाही. कक्षापासून लोकपालापर्यंतच्या प्रवासाबाबत खर्चाचा मंचाने विचार केलेला नाही, याचा अर्ज ग्राहकाने गाऱ्हाण्याचे निवारण स्वखर्चाने करावे हे दाखवून दिलेले आहे.

अपिलार्थीने अभिवेदनात खालील प्रमाणे मागण्या केल्या आहेत.

- अपिलार्थीना आजपर्यंत वीज जोडणी दिलेली नाही, सदर वीज जोडणी यापुढे विनाविलंब देण्यात यावी असे आदेश व्हावेत.
- न्याय मागणीसाठी करावा लागलेला खर्च म्हणून रु.१५००/- मंजूर व्हावेत.
- दिनांक ३१ डिसेंबर 2020 च्या मंचाच्या आदेशापासून वीज जोडणी दिली जाईपर्यंत झालेल्या मानसिक त्रासाबाबत प्रती दिन रु.५००/- प्रमाणे भरपाई दयावी. कृती मानके विनियम २००५ नियमानुसार दिनांक १ मे २०१३ ते वीज जोडणी देण्यापर्यंत, प्रती आठवडा रु.१००/- प्रमाणे भरपाई दयावी.
- सदर नुकसान भरपाईची रक्कम प्रतिवादींकडून व्यक्तिगत स्वरुपात वसूल करण्याचे आदेश व्हावेत.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

४.	प्रतिवादी महावितरणने दिनांक २ म २०२२ च्या उत्तरात खालील प्रमाणे मुद्दे नमुद केले.

- अपिलार्थींना वीज जोडणी देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या २८ पोल पैकी २४ पोलची वीज वाहिनी व रोहीत्र उभे करण्यात आले. उर्वरीत ४ पोलसाठी सौ. अनिता भुवद यांनी दिनांक २५ डिसेंबर २०२१ रोजी त्यांच्या जागेतून लाईन उभी करण्यास हरकत असल्याचे पत्र महावितणच्या गुहागर कार्यालयास सात बारा उतारासह दिले आहे. दरम्यानच्या काळात सदर तक्रार येण्यापर्वीच ९० टक्के काम झाले आहे. उर्वरीत १० टक्के काम हरकत घेतल्यामुळे प्रलंबित आहे. यावरून महावितरणचे धोरण हे काम पर्ण करण्याचे आहे, त्यामुळे अपिलार्थीचे वीज जोडणी केवळ हरकतीमुळे प्रलंबित राहीली, जाणूनबुजून विलंब केलेला नाही. सदर काम करण्यासाठी संबधित शाखाधिकारी, जनमित्र, ठेकेदाराचे कामगार सर्व साहित्यानिशी गेले असता जमीन मालकांच्या हरकतीमुळे वारंवार अर्धवट सोडून यावे लागले आहे. महावितरणची काम करण्याची मानसिकता नसती तर २४ पोल उभे राहीले नसते. या कामात अपिलार्थीने महावितरणला सहकार्य करण्याचे सोडून दिशाभूल करून काम कसे लांबणीवर पडेल अशीच कृती केली आहे.

- सुरवातीस प्रथम केलेल्या सर्व्हेनुसार सदर वाहिनी उपलब्ध असणाऱ्या रस्त्याच्या बाजून टाकण्यात येणार होती, परंतू, तेथील जमीन मालकांच्या हरकतीमुळे अन्य पर्यायांचा विचार करण्यात आला. उभे केलेले पोलही काढण्यात आले. अपिलार्थीचे चिरंजीव श्री. विराज सकपाळ यांनी सदर वाहिणी श्री. अनंत भुवड यांच्या जागेतून नेण्याचे सुचविले व सदर मार्गाने हरकत येणार नसल्याचे सांगितले व पोल उभारणीचो जागाही त्यांनीच सुचविली. जागाही अशी सुचविली की, जेथे हरकत येईल अशी त्यांना खात्री होती. नंतर असा बनाव केला की, सदर लाईन भुवडांच्या घरावरून जाईल. श्री. भुवड यांच्या हरकतीबाबत महावितरणने दिनांक ५ ऑक्टोबर २०२१ रोजी अपिलार्थीस पत्रान्वये कळविले. सदर हरकत मिटविण्याचा महावितरणने वारंवार प्रयत्न केला, परंतू त्यानी हरकत कायम ठेवली. शेवटी महावितरणने माननीय जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे दाद मागण्याचे निश्चित केले.
- दिनांक २८ नोव्हेंबर २०२१ रोजी श्री. भुवड यांची हरकत मिटल्याचे पत्र महावितरणला प्राप्त झाले. त्यानुसार महावितरणने काम करण्याची तयारी दर्शविली व शाखा अभियंता रोहीत डांबेराव व बाह्यस्तोत्र कर्मचारी कृष्णा तावडे सदर काम करण्यासाठी पाहणी करण्यास गेले असता श्री. भुवड यांची सदर कामास हरकत असल्याचे त्यांनी तोंडी सांगितले. सदर अर्ज मी दिलेला नाही, त्यातील मजकूर मला न विचारता लिहीला गेला व त्यावर माझी सही

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

फसवून घेतली असे अपिलार्थीसमोर तोंडी सांगितले. यावरून सदर अर्ज बनाव असून श्री भुवड यांना अंधारात ठेऊन त्यांची सही घेतल्याची निदर्शनास येते. सदर अर्जाची नक्कल प्रत अपिलार्थींना मिळाली व तो मंचाच्या सुनावणीमध्ये सादर केली. ती त्यांच्याकडे कोणत्या माध्यमातून पोहचली ही शंकेची बाब आहे. सदर अर्ज अपिलार्थींनेच तयार केलेला असून त्यांनी मंचाची दिशाभूल केली आहे.

- शेवटी काहीही पर्याय नाही, म्हणून वीज कायदा २००३ मधील तरतूदीनुसार अपिलार्थींचे काम पूर्ण करण्यासाठी माननीय जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्या अधिकाराखाली सदर विषयावर तोडगा निघण्यासाठी दिनांक २२ डिसेंबर २०२१ रोजी तहसीलदार, गुहागर, यांना पत्रान्वये कळविण्यात आले. यातून महावितरणला अपिलार्थीस वीज देण्याची तत्परता दिसून येते. सदर कामानिमित्त सर्व्हे करण्यासाठी जाण्याकरीता अपिलार्थींच्या सोबत येण्यास सांगितले असता त्यांनी येण्यास नकार दिला. यावरून त्यांची कामात सहकार्य करण्याची मानसिकता नसल्याच दिसते.

- श्रीमती स्मिता जाधव यांनी त्यांच्या हरकतीबाबत दिनांक ३ डिसेंबर २०२० रोजी महावितरणला पत्राने कळविले होते व तसे अपिलार्थीस दिनांक १५ जून २०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले परंतू श्रीमती जाधव यांच्या हरकतीबाबत महाराष्ट्र इलेक्ट्रीसीटी वर्क्स ऑफ लायन्ससी, रूल्स २०१२ मधील कलम ६८(३) मधील उपकलम ४ नुसार ११ केव्ही किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या वीज भाराच्या विद्युत उपरी तार मार्ग अथवा एका ग्राहकासाठी वापर होणाऱ्या उपरी तार विद्युत वाहिनी उभारणीसाठी लागू होत नाही, तसेच वीज कायदा २००३ मधील कलम १८० च्या तरतूदीनुसार ११ केव्ही किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या वीज भाराच्या विद्युत उपरी तार मार्ग अथवा एका ग्राहकासाठी वापर होणाऱ्या उपरी तार विद्युत वाहिनी उभारणीसाठी हरकत असल्यास संबधीत खात्याकडे दाद मागितली जावी असा उल्लेख केलेला नाही. सदर हरकती दूर करण्याचा महावितरणकडून वेळोवळी प्रयत्न केला गेला आहे व प्रसंगी दुसऱ्या पर्यायाचाही विचार करून काम थांबणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली आहे.

- अपिलार्थींना दिनांक ५ मार्च २०१९ रोजी अपारंपारिक (सोलर) उर्जा स्त्रोतातून वीज जोडणी घेण्याची विनंती केली होती, परंतू अपिलार्थींने ती फेटाळून पारंपारिक पध्दतीनेच वीज जोडणीचा अट्टाहास धरला, त्याकरीता २ किमी लांबीची उच्चदाब वाहिनी उभारावी लागणार

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

याची त्यांना कल्पना आहे. उच्चदाब वाहिनी उभारताना, त्या त्या जागामालकांची हरकत येणार याचीही त्यांना जाणीव होती. त्याच अनेक जागामालकांचे नुकसान होणार (जागा वाया जाणे, झाडांची छाटणी वा तोडणे, शेतीचे नुकसान) हे अटळ होते. सोलर उर्जा स्त्रोतातून फक्त अपिलार्थीच्या अर्धा गुठांचीच जमिनीचा भाग उपयोगात येणार होता. परतू अपिलार्थीना स्वतःचे नुकसान टाळण्यासाठी (दुसऱ्याचे नुकसान झाले तरीही) पारंपारिक पध्दतीनेच वीज जोडणीचा अट्टाहास धरला. अपिलार्थीच्या हया वर्तनावरून असे निदर्शनास येते की, अपिलार्थींना वीज जोडणीपेक्षा नुकसान भरपाई मिळण्यातच रस आहे.

- अपिलार्थीचे प्रतिनीधी प्रतिवादींशी नेहमी तुच्छतेने बोलतात, छोटया गोष्टीचा विपर्यास करून प्रकरण निकाली काढण्यात अडथळा आणतात. आगष्ट २०१९ मध्ये वीज देयक दुरूस्त करून देऊन सुध्दा, सबळ कारण नसताना, कल्पित गाऱ्हाणे तयार करण्यात आले. सबब, अपिलार्थीच्या प्रतिनिधीना याबाबत 'समज' देण्यात यावी हि विनंती.

- वरील सर्व बाबीचा विचार करता अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे, ही विनंती.

५. सदर अभिवेदनाची सुनावणी दिनांक २० मे २०२२ रोजी घेण्यात आली. दोन्ही पक्षांनी आपल्या लेखी निवेदनातील मुद्दे पुनश्चः मांडले. नवीन वीज जोडणीस झालेल्या विलंबास प्रतिवादीच सर्वस्वी जबाबदार आह असे अपिलार्थीने नमुद केले. नवीन वीज जोडणी लवकरात लवकर देण्यात यावी व त्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कृती मानके, विनियम २००५ नुसार नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी सुनावणी दरम्यान अपिलार्थीनो केली.

६. प्रतिवादीने नमुद केले की, अपिलार्थीच्या नवीन वीज जोडणीचे काम ९५ टक्के काम पर्ण झाले असून पुढील आठ ते दहा दिवसात सर्व अडचणी दुर करून लवकरात लवकर वीज जोडणी देण्यात येईल, असे आश्वासन सुनावणी दरम्यान दिले. अपिलार्थी यांच्या वीज जोडणी बाबत प्रतिवादी महावितरणकडुन कोणताही जाणीवपर्वक उशीर झालेला नाही. वीज जोडणीसाठी लागलेल्या पोल उभारणीसाठी संबधीत जागामालकानी घेतलेल्या हरकती दुर करताना लागलेला जास्तीचा कालावधी तसेच, कोव्हीड-१९, त्यानंतर त्याच दरम्यान आलेले वादळ, यामुळे अपिलार्थीची वीज जोडणी देण्यास विलंब झाल्याचे प्रतिवादींनी सुनावणी दरम्यान नमुद केले. त्यामुळे अपिलार्थीची मागणी फेटाळण्यात यावी.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai
M.E.R.C.

७.	सुनावणीमध्ये प्रतिवादींना आदेशीत केले की, या अभिवेदनातील विस्तृत आढावा घेऊन त्याचा घटनाक्रम सादर करण्यात यावा.

८.	प्रतिवादींनी या अभिवेदनातील दिनांक १२ एप्रिल २०१७ ते २५ डिसेंबर २०२१ या कालावधीतील घटनाक्रमाचा तपशील दिनांक २४ मे २०२२ रोजी पाठविला. त्यातील २०२१ मधील संक्षिप्त तपशील खालीलप्रमाणे.

| अनु.क्र. | दिनांक | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १३) | १२.०४.२०२१ | उपकार्यकारी अभियंता गुहागर यांच्या कडून तक्रारदारास हरकत मिटविण्याबाबत लेखी पत्र देण्यात आले. |
| १४) | १५.०४.२०२१ | कोविड-१९, पादुर्भाव, टाळेबंदी दुसरी लाट |
| १५) | १६.०५.२०२१ | तौक्ते वादळामुळे मनुष्यबळ कमी असल्यामुळे नवीन वीज जोडणीची कामे स्थगित करण्यात आली. |
| १६) | १५.०६.२०२१ | उपकार्यकारी अभियंता, गुहागर यांच्याकडून तक्रारदारास हरकत मिटविण्याबाबत पुनश्चः लेखी पत्र देण्यात आले. |
| १७) | २२.०७.२०२१ | चिपळूण पुर परिस्थितीमुळे, मनुष्यबळ कमी असल्यामुळे, नवीन वीज जोडणीची कामे स्थगित करण्यात आली. |
| १८) | ०२.१०.२०२१ | सुरवातीस प्रथम केलेल्या सर्व्हेनुसार सदर वाहिनी उपलब्ध असणाऱ्या कच्च्या रस्त्याच्या बाजूने टाकण्यात येणार होती. पण तेथील जमीन मालकाच्या हरकती असल्यामुळे अन्य पर्यायी मार्गाचा विचार केला गेला. याकरीता उभे केलेले पोल सुध्दा काढण्यात आले. त्यावेळी अपिलार्थी यांचे चिरंजीव विराज सकपाळ यांनी सदरची वाहिनी श्री. अनंत धाकटू भुवड यांच्या जागेतून नेण्याचे सुचविले व त्या मार्गाने काहीही हरकत येणार नसल्याचे सांगितले. पोल उभारणीची नेमकी जागाही त्यांनीच ठेकेदारांना सांगितली. सदर जागा ही जाणूनबुजूण अशा ठिकाणी दाखविण्यात आली की, जेथे हरकत येणार याची त्यांना खात्री होती. नंतर त्याच्यांकडुन असा बनाव करण्यात आला की सदर लाईन ही भुवड यांच्या घरावरून जाते. श्री. अनंत धाकटू भुवड यांनी ०२.१०.२०२१ रोजी हरकत असल्याचा अर्ज महावितरण कार्यालयास सादर केला. |
| १९) | ०५.१०.२०२१ | त्यानुसार महावितरणने अपिलकर्ते यांना उप काअ/गुहा/ता/१४६८ दिनांक ०५.१०.२०२१ नुसार श्री. अनंत धाकटू भुवड यांचे हरकत असल्याचे कळविले. |

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

| | | |
|---|---|---|
| | | यानंतर शाखा अधिकारी यांनी स्वतः वेळोवेळी श्री अनंत धाकटू भुवड यांची हरकत मिटविण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी त्यांची हरकत कायम ठेवली. परीणामी तोडगा काढण्यासाठी व कोणत्याही मार्गाने वीज जोडणीचे काम पर्ण व्हावे या प्रामाणिक उद्देशाने महावितरणने मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे दाद मागण्याचे निश्चित केले. |
| २०) | २८.११.२०२१ | मात्र दि.२८.११.२०२१ रोजी श्री. अनंत धाकटू भुवड या नावाने महावितरणला हरकत मिटण्याचा अर्ज गुहागर महावितरणमध्ये प्राप्त झाला. त्यानुसार महावितरणने काम करण्यासाठी तयारी दर्शविली असता, त्या करीता शाखा अभियंता श्री. रोहीत डाबेराव व बाह्यस्तोत्र कर्मचारी कृष्णा तावडे, वाहिनीचे काम करण्यासाठी प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी गेले असता, श्री. अनंत धाकटू भुवड यांनी त्यांच्या जागेतून 'वाहिणी टाकण्यास माझी हरकत कायम आहे', असे तोंडी सांगितले. दि. २८.११.२०२१ रोजी हरकत नसल्याचा अर्ज मी लिहीला नसून, त्यातील मजकूर मला न विचारता लिहिला गेला व त्या अर्जावर माझी सही घेतली, असे श्री. अनंत धाकटू भुवड यांनी अपिलकर्ता यांच्यासमोर सांगितले यावरून शाखा अभियंता अधिकारी तळवली यांना असे लक्षात आले की, सदरचा खोटा अर्ज हा स्वतः तक्रारदार यांनी बनविला असून त्यावर श्री. अनंत धाकटू भुवड यांना फसवून त्यांची सही घेतलेली आहे. श्री. अनंत धाकटू भुवड यांच्या हरकतीचे पत्र व भात शेती करणाऱ्या शेतकऱ्याच्या विनंती वरून भाताचे पीक काढू पर्यंत सदरचे काम थांबविण्यात आले होते. अन्यथा शेतीचे नुकसान झाले असते. |
| २१) | २२.१२.२०२१ | अर्जदाराच्या नवीन वीज जोडणीसाठी सतत येत असलेल्या हरकतीमुळे उभे केलेले पोल काढले व अन्य पर्यायी मार्ग शोधून पोल उभे करणे या गोष्टीच्या अनुषंगाने शाखा अधिकारी तळविली यांनी मा. तहसिलदार कार्यालयास हरकत निवारण करण्यासाठीचे पत्र दिनांक २२.१२.२०२१ रोजी देण्यात आले. |
| २२) | २५.१२.२०२१ | श्री. अनंत धाकटू भुवड यांच्या सुविध्य पत्नी श्रीमती अनिता अनंत भुवड यांनी उपकार्यकारी अभियंता गुहागर यांची उपविभाग गुहागर येथे प्रत्यक्ष भट घेऊन आपली हरकत कायम असल्याचा अर्ज सादर केला व २८.११.२०२१ रोजी अर्ज हा त्यांचे पती श्री. अनंत धाकटू भुवड यांच्या नावे असून सदर अर्जामध्ये त्यांचे पती श्री. अनंत धाकटू भुवड यांचे वाढते वयोमान व कमी दिसणे या अभावांमुळे चुकून अर्ज न वाचता सही केली आहे. त्यामुळे या अर्जाचा विचार महावितरणकडुन केला जाऊ नय, अशी विनंती केली. व सदर अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे महावितरण, गुहागर यांच्या सांगण्यावरून किंवा महावितरण अधिकारी/ठेकेदार यांच्या अरेरावी मुळे हरकत केली गेली, असे लिहिण्यात आले होते. परंतू असा कोणताही प्रकार घडला नसल्याचे कळविले. |

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

**विश्लेषण व निर्णय**

९. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. सदरचा 'अनुसूची ब' अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री. आनंद ओक यांनी स्वतः अपिलार्थीतर्फे मुखत्यार पत्राद्वारे स्वाक्षरी करून सादर केला आहे. अपिलार्थीतर्फे अश्याच अर्थाचे निवेदन त्यांच्या लिखित युक्तिवादापोटी सादर केलेल्या पत्रात केलेले आहे. नुकसान भरपाईचा अर्ज हा, ज्याचे नुकसान झाले, त्याने तो स्वतःच्या स्वाक्षरीने करावयाचा असतो. नुकसानदाराच्यातर्फे इतर कोणी केलेला अर्ज हा नियमा अंतर्गत ग्राहय धरला जाऊ शकत नाही. याबाबत, महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र. संकिर्ण २०१९/प्र.७१/१८(र.व.का.) मंत्रालय, मुंबई लक्षात घेणे गरजेचे आहे. सदरील सर्व प्रकरणात नुकसान भरपाईचा अर्ज हा माननीय आनंद शिवराम ओक, जे की, ग्राहक प्रतिनिधी आहेत, यांनी स्वतःची स्वाक्षरी करून केलेला आहे. याशिवाय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाहाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६) मधील विनियम ६.१५ मधील तरतूद लक्षात घेणे गरजेचे आहे.

**विनियम क्र. ६ गाऱ्हाणे निवारण्यासाठी कार्यपध्दती**

**विनियम क्र. ६.१५**

*"ग्राहक, वितरण परवानाधारक किंवा अन्य कोणतीही व्यक्ती मंचासमोर असलेल्या कोणत्याही कार्यवाहीत पक्षकार असेल तर ती मंचापुढे व्यक्तिशः उपस्थित राहील किंवा अधिवक्ता (अधिवक्ता अधिनियम, १९६१ मधील अर्थानुसार) वगळून कोणत्याही इतर व्यक्तिस, मंचासमोर त्याचे प्रकरण मांडण्यासाठी किंवा या प्रयोजनासाठी लागणारे किंवा इतर सर्व कामे करण्यासाठी, प्राधिकृत करेल."*

वरील दोन्ही तरतूद पाहता हे स्पष्ट होते को, ग्राहक प्रतिनिधीस ग्राहकातर्फे नुकसान भरपाईचा अर्ज सादर करण्यास परवानगी देत नाही. न्यायिक किंवा अर्धन्यायिक व्यवस्थे अंर्तगत सादर केलेली कागदपत्रे हि स्वतः अपिलार्थीने स्वाक्षांकित करणे गरजेचे असते. वकील किंवा प्रतिनिधी त्यांच्या पक्षकाराची बाजू त्या त्या न्यायासनासमोर मांडतात, मात्र, कागदपत्रे ही पक्षकारांनीच स्वसाक्षांकित करावयाची असतात.

१०. असे निदर्शनास येते की, प्रतिवादींनी वीज जोडणीच्या एकुण कामापैकी ९५ टक्के काम पर्ण केले आहे. तथापि, निरनिराळया लोकांकडुन येणाऱ्या हरकतीमुळे राहीलेले ५ टक्के काम पर्ण करण्यात अडथळा येत आहे. असे दिसते की, कोवीड -१९ चा पार्दुभाव दिनांक १८ मार्च २0२0 रोजी सुरु झाला व दिनांक २३ मार्च २0२0 पासून कोवीड महामारीबाबत कडक निर्बंध लागू करण्यात आले. दिनांक 0३ जून २0२0 रोजी

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

निसर्ग चक्रीवादळामुळे मनुष्यबळ कमी असल्यामुळे नवीन वीज जोडणीची कामे प्रतिवादींनी स्थगित केली. वादळानंतर परिस्थिती पर्ववत झाल्यानंतर, नवीन वीज जोडणीचे काम पुन्हा सुरू करण्यात आले. प्रतिवादीने असे नमुद केले की, काम करत असताना ज्या जागेतून किंवा ज्या लगत विद्युत वाहिनी टाकण्यात येणार होती. त्या संबधीत जागा मालकांच्या वारंवार हरकती येत होत्या. त्या हरकती वेळोवेळी सामोपचाराने महावितरण कडुन सोडविण्यात येत होत्या. ज्या जागेबाबत हरकतीचे निवारण होत नव्हते अशा जागांची पुनः स्थळ पाहणी करून वीज वाहिणीसाठी पर्यायी मार्गाचा अवलंब करण्यात येत होता, पण काम चालू ठेवण्यात आले. तहसीलदार व तंटामुक्तीच्या माध्यमातून येणाऱ्या अडचणी दुर करून अपिलार्थीचे काम लवकरात लवकर कसे करता येईल हा प्रयत्न प्रतिवादीने केल्याच दिसून येत.

अपिलार्थी हे स्वतः त्याभागात नामांकीत डॉक्टर आहेत, त्यामुळे त्यांनी सुध्दा या कामात पुढाकार घेणे गरजेचे होते. या कार्यालयातून सुध्दा सुनावणीनंतर प्रतिवादींना केलेल्या कामाचा आढावा विचारण्यात आला असता प्रतिवादींनी ३१ मे २०२२ रोजी इमेलद्वारे या कार्यालयास अपिलार्थींना वीज जोडणी दिल्याचे नमुद केले.

११. अपिलार्थीचे प्रतिनीधी प्रतिवादींशी नेहमी तुच्छतेने बोलतात, छोटया गोष्टीचा विपर्यास करून प्रकरण निकाली काढण्यात अडथळा आणतात. प्रतिवादींच्या या आरोपात तथ्य आढळल्याचे दिसून येते. म्हणून अपिलार्थीच्या प्रतिनिधींना अशा वर्तनाची पुनःवृत्ती होऊ नये याबाबत योग्य ती काळजी घ्यावी अशी समज देण्यात येत आहे.

१२. वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीच्या इतर सर्व मागण्या फेटाळण्यात येत आहेत.

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.